ऐक्य
९२ वर्षांची वाचनीय परंपरा
e : www.dainikaikya.com सातारा गुरुवार दि. १२/१/२०१७ email : news@dainikaikya

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# डी. पी. भोसले कॉलेजचे आजपासून चिमणगाव येथे शिबिर

**कोरेगाव**, दि. ११ : रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले कॉलेज व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. १२ ते १८ जानेवारी या कालावधीत चिमणगाव येथे होत आहे.

दि. १२ रोजी दुपारी ३ वाजता राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कृषी व संचालक शिक्षण विभागाचे अधिष्ठाता डॉ. भीमराव उल्मेक यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या अध्यक्षतेखाली शिबिराचे उद्घाटन होणार आहे. यावेळी कोरेगावचे नगराध्यक्ष प्रशांत उर्फ राजाभाऊ बर्गे, उपनगराध्यक्ष जयवंतराव पवार व पोपट करपे उपस्थित राहणार आहेत. शिबिर कालावधीत विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दि. १८ रोजी सकाळी ११ वाजता शिबिराचा समारोप होणार आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी हिम्मत खराडे व प्रसाद राक्षे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमांचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत व कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. बी. पवार यांनी केले आहे.